REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २८ जुलै, १९४८ अंक ३०


## दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बॅंक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी | ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी | ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल | ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बॅंक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बॅंकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटींसाठी चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## सारस्वत को–ऑपरेटिव्ह बॅंक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बॅंक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,११,०५० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,३४,१९७ |
| ठेवी | ... | रु. ८९,०१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ८९५४,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा –

सब–ऑफिस :
—दादर—
( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्.
चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्.
सेक्रेटरी

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स ताबडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## नवीन भाडें नियंत्रण कायदा

| | | |
|---|---|---|
| सुबोध विवरण व संकलन | | किं. २ रु. |
| मुंबई सावकारी कायदा | | किं. २॥ रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | | किं. ३ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा | कापडी | किं. ४॥ रु. |
| | कागदी | किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकेडेमी, ७१० सदाशिव, पुणें २.

[illegible] मशिनरी (१)
नेमी उपयोगी
# शिमोगा लेथ
(८'–१०")
संपूर्ण पोलादी, यांत्रिक परीक्षा, ... कुशल कारागिरांनी ...
—भेटीचे स्थान—
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणे २.

## विविध माहिती

**टेलिफोनच्या कारखान्याची जागा**—हिंदुस्थान सरकार स्वतःच्या मालकीचा, ऑटोमॅटिक टेलिफोन तयार करण्याचा कारखाना काढणार आहे. या कारखान्याची जागा म्हैसूर संस्थानात निश्चित करण्यात आली आहे. बंगलोर पासून ६ मैल पूर्वेला ६०० एकरांचा एक तुकडा या कारखान्यासाठी पसंत करण्यात आला आहे. ही जागा बंगलोर–मद्रास रेल्वेरस्त्यावर असून म्हैसूर सरकार ती मक्ता करून देणार आहे. यानंतर कारखान्याच्या इमारतींचे प्राथमिक काम संपून आयात करण्यात येणाऱ्या सुट्या भागांच्या साहाय्याने टेलिफोनचे सुटे भाग जुळविण्याचे काम चालू होईल असा अंदाज आहे. कारखान्याची कायमची पक्की इमारत तयार होण्यास १८ महिने लागतील. येथील मुदतीच्या करारानें पहिल्या वर्षांतून १० लक्ष आणले जातील. त्याची मुदत संपल्यावर त्यांच्या सल्ल्याप्रमाणे तयार झालेले हिंदी तज्ज्ञ कारखाना चालवितील.

**महात्माजींच्या चित्राची तिकिटें**—म. गांधींचा वध झाल्यानंतर एका आठवड्याच्या आंतच हिंदी पोस्ट खात्यानें राष्ट्रपित्यांचें स्मारक करण्याचें ठरविलें, आणि त्यादृष्टीनें कामास प्रारंभ केला. पोस्टाच्या तिकिटावर छापण्यासाठी महात्माजींचे अनेक फोटो निवडण्यात आले. त्यांपैकी दोन विशेष पसंत करण्यात आले. एक हिंद सरकारच्या आरोग्य खात्याच्या मंत्री, राजकुमारी अमृत कौर यांच्या जवळचा आणि दुसरा 'लाइफ' या अमेरिकन साप्ताहिकाच्या दिल्ली येथील प्रतिनिधीच्या संग्रहातला. महात्माजींच्या स्मरणार्थ काढण्यात आलेली ही तिकिटें किंमतीच्या दृष्टीनें चार प्रकारची आहेत. एकूण ३ कोटी, २५ लाख तिकिटें काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी २ कोटी, ५० लाख तिकिटें दीड आण्याची, ५५ लाख साडेतीन आण्याची, १७ लाख, ५० हजार १२ आण्यांची आणि २ लाख, ५० हजार १० रु. ची. या सर्व तिकिटांची मिळून किंमत ७५ लाख रु. होईल.

• **दामोदरदरी योजनेकरता तज्ज्ञ**—दामोदरदरी येथें उभारावयाच्या जल-निर्मित विद्युत्-केंद्राविषयी सल्ला देण्यासाठी कॅनडा-[illegible] सरकारनें तज्ज्ञ एंजिनियरांची एक कमिटी नेमली आहे.

**हिंदुस्थानांतील कापसाची लागवड**—इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें १९४६-४७ सालच्या आपल्या अहवालांत पुढील माहिती दिली आहे:—३१ ऑगस्ट, १९४७ रोजीं पुरा झालेल्या वर्षात फाळणी न झालेल्या हिंदुस्थानांतील कापसाच्या लागवडीचें क्षेत्र १ टक्क्यानें वाढलें. कापसाची लागवड एकूण १ कोटी, ४८ लाख, ६० हजार एकरांत करण्यात आली. ४०० पौंडांची एक गांठ या प्रमाणें ३१ लाख, ९९ हजार गांठी कापूस पिकेल असा अंदाज करण्यात आला होता. प्रत्यक्ष गांठी ४५ लाखांवर तयार झाल्या. १९४७-४८ सालीं कापसाची लागवड वाढविण्याची शिफारस कमिटीनें केली आहे. देशांतील अन्नधान्याची परिस्थिति बिघडणार नाही अशा बाजूनेंच अधिक शिफारस करण्यात आलेली आहे.

**मुंबईतील ब्रिटिश कंपनी**—मुंबईतील सर्वांत जुनी ब्रिटिश कंपनी ... कंपनी या कंपनीचे ४० टक्क्यांपेक्षा अधिक भाग एका हिंदी व्यापाऱ्याच्या नांवानें घेतल्याची बातमी आहे. ही ब्रिटिश कंपनी १८०७ सालीं स्थापन झालेली असून तिचा आयात-निर्यातीचा धंदा होता. कंपनीच्या स्वतःच्या स्वामित्वाखालील तिच्याकडे दोन कापडाच्या गिरण्यांची, एका ... फॅक्टरीची, एका ... कंपनीची व इतर ... एजन्सीज आहेत.

**वैमानिक इंजिनिअर लायसेन्सिंग**—वायु इंजिनिअर स्कीम प्रमाणें अधिकृतपणें काम करणाऱ्या इसमांना सरकारनें असें कळविलें आहे की ता. ३१ मे १९४८ पर्यंत दिलेल्या वैमानिक इंजिनिअर लायसेन्सबद्दल कमिशन ... त्या अधिकाऱ्याकडून ता. ३१ जुलै १९४८ पूर्वी त्यांनी ... आहे. त्यानंतर मध्यवर्ती अगर प्रांतिक सरकारें कमिशनच्या हक्काचा विचार करणार नाहीत.

**बिनतिकिटांच्या प्रवाशांकडून वसूल**—ईस्ट इंडियन रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी बिनतिकिटाच्या प्रवाशांना पकडण्याची व आकार न देतां सामान नेणाऱ्यांविरुद्ध मोहीम काढली होती. या मोहिमेत मे १९४८ अखेर रेल्वेला १,७६,२९१ रुपये वसूल झाले. तिकिटें त्यांनी काढलेली नाहीत आणि सामानाचा आकार दिलेला नाही असे ७२९१ प्रवासी रेल्वे अधिकाऱ्यांनी पकडले.

**चीनमधील नव्या नोटा**—ता १५ जुलै पूर्वी चीनमध्यें जास्तीत जास्त किंमतीची एक चलनी नोट म्हणजे १ लाख चिनी डॉलरची होती. आता मात्र जास्तीत जास्त ५० लाख चिनी डॉलरच्या नोटा काढण्यात आल्या आहेत. या नव्या नोटांमुळें चिनी नोटांची किंमत अधिकच घसरेल अशी भीति बाजारांत व्यक्त करण्यात येत आहे. कांहीं आठवड्यांपूर्वी चीनमधील चलनी नोटांचा भाव घसरला, तो इतका की एका अमेरिकन डॉलरला ६५ लाख चिनी डॉलरी मिळू लागले. चलनाची किंमत स्थिर करण्याच्या चिनी सरकारच्या योजनेचाच नवें चलन हा भाग आहे, असें सरकारतर्फे सांगण्यात येत आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी — मद्दिकर ब्रदर्स — गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणे

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचें आगर—
खादी मन्दिर
१६९, बुधवार पेठ, [illegible], पुणे २

# अर्थ

बुधवार, ता. २८ जुलै १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी सहकारी चळवळीचा आढावा

**( १९३९-४६ )**

**युद्धजन्य परिस्थितीनें आणलेली सुदृढता टिकेल काय ?**

रिझर्व्ह बँकेनें हिंदी सहकारी चळवळीचा पहिला आढावा १९४१ सालीं प्रसिद्ध केला, त्यांत १९३९-४० ह्या मुदतीमधील प्रगतीचाच परामर्श घेण्यांत आला होता. दर वर्षी असा आढावा प्रसिद्ध करण्याचा उद्देश होता, परंतु कागदाच्या मध्यंतरीच्या टंचाईमुळें तो साध्य होऊं शकला नाहीं. प्रस्तुत आढावा १९३९-४६ च्या आकड्यांवर आधारलेला आहे. सहकारी चळवळीच्या महत्त्वाच्या कालखंडाचा इतिहास त्यांत आढळतो. सर्वच प्रकारच्या जिनसांस वाढती मागणी होती आणि पुरवठा मात्र अपुरा पडत होता; त्याकारणानें बाजारभाव एकसारखे चढत चालले होते. शेतकऱ्यास त्यामुळें त्याच्या उत्पादनास चांगली किंमत मिळाली, आणि कर्जावरील त्याचें अवलंबन कमी झालें. तथापि, जीवनावश्यक वस्तूंचा व शेतीस आवश्यक अशा जिनसांचा शेतकऱ्यास योग्य दरानें पुरवठा होणें कठीण होऊं लागलें. त्यामुळें काळ्या बाजारास उत्तेजन मिळून शेतकऱ्यांप्रमाणें इतर नागरिकांनाहि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. ह्या परिस्थितीमुळें, उत्पादन आणि वाटप ह्यांची सहकारी पद्धतीनें संघटना करण्याचें अगत्य सत्वर पटूं शकलें आणि सहकारी चळवळीस इष्ट असें वळण लागलें.

कंझ्युमर्स सोसायट्यांची प्रगति मद्रासमध्यें विशेष घडून आली; त्याचे तुलनात्मक आकडे येथें दिले आहेत.

| | १९३८-३९ | १९४५-४६ |
|---|---|---|
| कंझ्युमर्स सोसायट्या | ८५ | १,३४६ |
| त्यांचा व्यवहार | २४ लक्ष रु. | १३ कोटी, ५८ लक्ष रु. |

विणकरांच्या सोसायट्या, दूध पुरविणाऱ्या संस्था, इत्यादींसहि चालना मिळाली. मद्रासमधील विणकरांच्या सोसायट्यांची प्रगति नजरेंत भरण्याजोगी आहेः—

| | १९३८-३९ | १९४५-४६ |
|---|---|---|
| विणकरांच्या सोसायट्या | १७४ | ३३६ |
| त्यांची विक्री | ७½ लक्ष रु. | ३ कोटी, ७३ लक्ष रु. |

दूध पुरवठा सोसायट्यांतहि मद्रासची आघाडी आहे.

| | १९३८-३९ | १९४५-४६ |
|---|---|---|
| दूध पुरवठा सोसायट्या | ५१ | २५३ |
| त्यांची विक्री | २¾ लक्ष रु. | ४२¾ लक्ष रु. |

संयुक्त प्रांत व बिहार येथें उंसाचें पीक मोठें आहे. तेथील केन युनियन्सची संख्याहि उठावदारपणें वाढली आहे आणि त्यांच्या वार्षिक व्यवहाराची रकम ४० लक्ष रुपयांवरून ११० लक्ष रुपयांवर गेली आहे.

सहकारी चळवळीच्या सर्वसाधारण प्रगतीचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत. त्यांवरून, सोसायट्यांच्या संख्येंत ४१% वाढ होऊन सभासदांच्या संख्येंत ७०.६% वाढ झाली आहे आणि खेळत्या भांडवलांतील वाढीचें प्रमाण ५४.०% आहे असें दिसून येईल. १९३८-३९ मध्यें प्रत्येक ५४ गांवांत १० सोसायट्या होत्या. १९४५-४६ मध्यें ३८ गांवांत १० सोसायट्या असें प्रमाण पडलें. १९३८-३९ मध्यें एकूण ६.२% लोकसंख्येचा सहकारी चळवळीशीं संबंध आला; १९४५-४६ मध्यें १०.६% लोकसंख्या सहकारी चळवळीशीं निगडित होती.

**सहकारी सोसायट्या, त्यांचे सभासद व खेळतें भांडवल**

| | हजार सोसायट्या | लक्ष सभासद | कोटी रु. खेळतें भांडवल |
|---|---|---|---|
| १९३८-३९ | १२२ | ५३.७ | १०६.४७ |
| १९४०-४१ | १४३ | ६४.० | १०९.३२ |
| १९४२-४३ | १४६ | ६९.१ | १२१.१४ |
| १९४४-४५ | १६० | ८३.६ | १४६.६३ |
| १९४५-४६ | १७२ | ९१.६ | १६४.०० |

१९२९ च्या मंदीपासून ते दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत चळवळीची प्रगति फारशी उत्साहकारक नव्हती, परंतु युद्धकाळांत ती बरीच चांगली झाली. खेळतें भांडवल १०६ कोटी रुपयांवरून १६४ कोटी रुपयांवर गेलें; तथापि युद्धकालीन चलनविस्ताराशीं ह्या वाढीची तुलना समाधानकारक होऊं शकत नाहीं. सोसायट्यांनींच कर्जास मागणी कमी आहे ह्यासाठी आपले फंड वाढविण्याकडे लक्ष दिलें नसेल; किंवा शेतकऱ्यांनीं आपल्या कर्जमुक्ततेनंतर बचतीकडे कानाडोळा करून पुनः खर्चिक संवयी लावून घेतल्या असतील" अशीं दोन संभाव्य कारणें रिझर्व्ह बँकेच्या आढाव्यांत पुढें करण्यांत आलीं आहेत. सभासदांच्या ठेवींत वाढ करून खेळतें भांडवल वाढविण्याची संधि त्यामुळें शेतकरी गमावून बसले.

सोसायट्यांनीं दिलेलीं कर्जें, केलेली उलाढाल व झालेली वसुली ह्यांचे आकडे पाहिले तर त्यांत सुधारणा दिसून येते.

**सहकारी सोसायट्यांचा कर्जव्यवहार**

| वर्ष | सोसायट्या ( लक्ष ) | व्यक्तींना दिलेलीं कर्जें ( कोटी रु. ) | व्यक्तींची कर्जांची परतफेड कोटी रु. | येणें बाकी कर्जें कोटी रु. | त्यापैकी थकबाकी कोटी रु. |
|---|---|---|---|---|---|
| १९३८-३९ | १.२२ | २६.४१ | २४.३६ | ४६.९५ | १४.०५ |
| १९३९-४० | १.३७ | २६.८० | २५.६५ | ४७.१३ | १३.८४ |
| १९४०-४१ | १.४३ | २६.२३ | २५.९६ | ४६.७५ | १३.४७ |
| १९४१-४२ | १.४५ | २९.३० | ३०.०१ | ४६.०२ | १२.९१ |
| १९४२-४३ | १.४६ | ३२.९८ | ३४.८७ | ४४.१३ | ११.७७ |
| १९४३-४४ | १.५६ | ४०.०६ | ४०.९३ | ४३.७४ | १०.३६ |
| १९४४-४५ | १.६० | ४१.७६ | ४२.१२ | ४४.९९ | ९.१६ |
| १९४५-४६ | १.७२ | ५१.७५ | ४९.६८ | ४६.९४ | ८.५२ |

१९४३, ४४, ४५ व ४६ मध्यें नव्या कर्जांत वाढ दिसत आहे, परंतु येणें कर्ज कमीच होत गेलेलें आहे. फक्त १९४५-४६

मध्यें तें वाढलें आहे. घेतलेल्या कर्जापेक्षा परतफेडीची रकमच ज्यास्त होती. थकबाकीच्या उतरत्या आकड्यावरून, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी होत गेल्याचें स्पष्ट होतें. १९३८-३९ मध्यें एकूण सोसायट्यांपैकी ८·७% सोसायट्यांचें लिक्विडेशनचें काम चालू होतें; १९४५-४६ मधील तत्सम प्रमाण ६·३% होतें. ह्यावरूनहि, सोसायट्यांच्या मजबुतीमधील वाढीसच दुसरा दाखला मिळतो. युद्धजन्य परिस्थितीमुळें सहकारी चळवळीस सुदृढता येण्यास सहाय झालें असलें, तरी मामुली काळांत ही प्रवृत्ति कितपत टिकून रहाते, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. प्रांतिक सहकारी खातीं ह्या संबंधांत प्रयत्न करीत आहेतच.

## हॅवाना परिषदेचें कार्य

अमेरिकेचे क्लेअर विलकॉक्स यांनीं महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेची (आय. टी. ओ.) कल्पना काढल्यावर लंडन, जिनेव्हा व हॅवाना येथें परिषदा भरून आय. टी. ओ. च्या मसुद्याच्या कलमांची चर्चा करून त्यांत बरेच फेरबदल सुचविले गेले. हॅवाना येथील परिषद २१ नोव्हेंबर, १९४७ पासून २४ मार्च, १९४८ पर्यंत चालू होती व जगांतील ५६ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं त्यांत भाग घेतला. परंतु हॅवाना परिषदेच्या कार्याला मिळावी तशी प्रसिद्धी मिळाली नाहीं, कारण जगापुढें प्रत्यक्ष राजकारणाचे व आर्थिक पुनर्घटनेचे कार्यक्रम जास्त महत्त्वाचे असे होते. लंडन व जिनेव्हा येथील परिषदांची बरीच चर्चा झाली असल्यामुळेंहि हॅवाना येथील चर्चा विशेष लक्ष वेधणारा विषय बनला नसावा.

जागतिक आंतरराष्ट्रीय खुला व्यापार सुरू व्हावा, व्यापाराची वाढ व्हावी, कोठेंहि बेकारी असूं नये, कृत्रिम रीत्या एखाद्या देशानें व्यापार रोखून धरूं नये व संरक्षक जकातीची भाषा अजिबात नष्ट व्हावी इ. उच्च उद्देश आय. टी. ओ. च्या बुडाशीं आहेत. त्या संघटनेचा पुरस्कार, महायुद्धोत्तर जगांत सर्वांत अग्रभागीं चमकणाऱ्या व पूर्वी संरक्षणाच्या तत्त्वावरच आपल्या परराष्ट्रीय व्यापाराची भरभराट साधणाऱ्या अमेरिकेकडून झाला आहे. जगांत राजकारणाच्या बाबतींत एकवाक्यता साधण्याचे राष्ट्रसंघ व यूनो या संस्थांकडून अगदीं अलिकडच्या काळांत झालेले प्रयत्न जवळ जवळ निष्फळ ठरले. १९३० नंतरच्या जागतिक मंदीच्या काळांत तर निरनिराळ्या पुढारलेल्या राष्ट्रांत व्यापाराच्या बाबतींत संरक्षणाच्या तत्त्वावर अधिष्ठित आर्थिक युद्धच चालू होतें व प्रत्येक देश केवळ आपल्या पुरता विचार करीत असे. आतां १९४५ नंतर जगाची परिस्थिति खरोखरच इतकी सुधारली आहे कीं काय कीं सर्व देशांनीं एकमतानें आय. टी. ओ. नें पुरस्कारिलेल्या खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्वीकार करावा?

जागतिक परिस्थिति अशा तऱ्हेच्या तत्त्वाच्या अंमलबजावणीला फारशी पोषक नाहीं. कारण महायुद्धानंतर, आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या अत्यंत समाधानकारक स्थितींत असलेलीं फार थोडीं राष्ट्रें व आर्थिक दृष्ट्या विपन्नावस्थेंतील व औद्योगिक दृष्ट्या जवळजवळ प्राथमिक अवस्थेमध्यें असलेलीं अनेक राष्ट्रें असे दोन गट आपल्याला आढळतात. अन्नपुरवठ्याचा बिकट प्रश्न युरोप-आशियांतील राष्ट्रांना भेडसावून सोडीत आहे. औद्योगिक दृष्ट्या प्राथमिक अवस्थेंतील राष्ट्रांना यंत्रसामुग्री व यांत्रिक तज्ज्ञ यासाठी सुस्थितींत असलेल्या राष्ट्रांकडे आशाळभूतपणानें पाहावें लागत आहे. अशा परिस्थितींत आय. टी. ओ. च्या तत्त्वाचा स्वीकार हा औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांनाच विशेष फायदेशीर आहे. यामुळें औद्योगिक दृष्ट्या मागसलेल्या देशांकडून लंडन व जिनेव्हा येथें आय. टी. ओ. च्या चार्टरला बराच विरोध करण्यांत आला, व तो विरोध हॅवाना येथील चर्चेत यशस्वी करून आय. टी. ओ. च्या मूळ चार्टरचें स्वरूप बरेंच बदलण्यांत आलें आहे. हॅवाना परिषदेचें हेंच मुख्य कार्य आहे, असें म्हटलें पाहिजे.

युद्धामध्यें नुकसान झालेले व ज्यांची औद्योगिक वाढ व्हावयाची आहे अशा देशांना, जरूरीप्रमाणें इतर देशांशीं सवलतींचे व्यापारी संबंध ठेवणें व आयातीवर निर्बंध घालणें किंवा आयातींचें प्रमाण ठरवून देणें व व्यापारावर व्यापाराचा विस्तार मर्यादित करणारे निर्बंध घालणें, अशा आशयाच्या सवलती मान्य करण्यांत आल्या आहेत. हिंदुस्थानसारख्या देशाच्या दृष्टीनें हॅवाना येथें मान्य झालेली ही सवलत विशेष महत्त्वाची आहे. देशाच्या औद्योगिक विकासाला संरक्षणाच्या तत्त्वानें सरकारनें मदत करणें ही गोष्ट मान्य करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें शेतीलाहि मदत देण्याचें तत्त्व मान्य झालें आहे. विशिष्ट परिस्थितींत आर्थिक पुनर्घटनेसाठी देशादेशांतील सवलतींचे करारनामे मान्य करण्यांत आले आहेत. परराष्ट्रीय भांडवलाला कोणत्याहि देशांत पूर्ण प्रवेश असावा असें मूळ चार्टरमध्यें होतें. परंतु हॅवाना येथील चर्चेत परराष्ट्रीय भांडवल देशाच्या अंतस्थ राजकारणांत कोणत्याहि प्रकारें हस्तक्षेप करणार नाहीं व पुढील काळांत कोणत्या अटीवर व किती प्रमाणांत परराष्ट्रीय भांडवल येऊं द्यावें इ. गोष्टी स्पष्टपणें मान्य करण्यांत आल्या आहेत. तेव्हां, आय. टी. ओ. च्या नांवाखालीं परराष्ट्रीय भांडवलाला मागासलेल्या देशांत मुक्तद्वार रहाणार नाहीं. सारांश, हॅवाना परिषदेनें आय. टी. ओ. च्या मूळ कल्पना मागासलेल्या देशांच्या हिताच्या दृष्टीनें पुष्कळशा व्यावहारिक पातळीवर आणल्या आहेत, असें दिसून येईल.

**झेकोस्लोव्हाकिआचा परराष्ट्रीय व्यापार**—झेकोस्लोव्हाकिआचा परराष्ट्रीय व्यापार ता. १ सप्टेंबर १९४८ पासून पूर्णपणें त्याच्या सरकार मार्फत चालणार आहे. त्या देशांतील आयात-निर्यातीचा व्यवहार करणाऱ्या सर्व कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण ह्यापूर्वीच झालेलें आहे. ह्या सर्व कंपन्यांचें केंद्रीकरण आणि पुनर्घटना आतां नव्यानें करण्यांत येणार आहे.

**निर्वासितांना अमेरिकन मदत**—अमेरिकेंतील नॅशनल कॅथॉलिक वेलफेअर रिलीफ कमिटीनें हिंदुस्थानांतील निर्वासितांना मदत म्हणून १ लाख, ८० हजार पौंड चॉकोलेट पावडरची देणगी दिली आहे. संस्थेच्या बंगलोर येथील प्रतिनिधीनें ही देणगी नुकतीच मद्रास सरकारच्या हवालीं केली. मद्रासमध्यें ह्या मदतीच्या वांटणीला लवकरच प्रारंभ होईल.

**इंग्लंडमधील धंद्यांची दुरवस्था**—सुमारें दहा वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें जितके उद्योगधंदे बुडाले, तितकेच आजही बुडूं लागले आहेत. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत ६३४ धंदेवाल्यांचें दिवाळें निघालें. ३० जून अखेर पूर्ण झालेल्या तिमाहींत ७४७ धंदेवाल्यांचें दिवाळें निघालें. १९४६ सालीं ३७० धंद्यांचीं दिवाळीं निघालीं तर १९४७ सालीं ७१८ धंदेवाले बुडाले. १९३८ सालीं धंदे बुडण्याची तिमाही सरासरी ८५० होती. बुडालेल्या धंद्यांत इमारतींचें बांधकाम करणाऱ्या कंपन्या, मोटार गॅरेजेसच्या कंपन्या, मोटार वर्कशॉप्स, छापखाने, प्रकाशन संस्था, शेतकी संस्था, एंजिनिअरिंगचे कारखाने, इत्यादी प्रकारचे धंदे आहेत.

**मुंबई प्रांतांतील प्राथमिक शिक्षण**—मुंबई प्रांतांतील ज्या खेड्यांचें गांवठाण सलग असेल आणि ज्यांची लोकसंख्या १ हजारावर असेल, अशा खेड्यांतून १९४९ सालापासून सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

## ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें बँकांचें नियंत्रण

लेखकः—श्री. ल. म. जोशी, बी. कॉम्., सर्टि. ए. आय. बी. (लंडन), सर्टि. ए. आय. आय. बी. (मुंबई)

पाश्चिमात्य पद्धतीचा बँकिंगचा व्यवहार आपल्याकडे साधारणपणें इंग्रजांचा पाय येथें रुतल्यावर व त्यांस निर्यात व आयात या व्यापारांस मदतीची जरूर लागल्यानंतर म्हणजे साधारणपणें १५०–१७५ वर्षांपासून सुरू झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें असूनसुद्धां त्यांच्या व्यवहारांचें एकीकरण करून सुसूत्रता आणणारा असा स्वतंत्र कायदा अजूनही अस्तित्वांत नसल्याचें पुष्कळ जणांस आश्चर्य वाटेल ! ही उणीव लवकरच भरून काढण्याचें आतां सरकारनें ठरविलें आहे व कायदा पास करण्यापूर्वी रीतीनुसार एक बिल लोकांच्या माहितीकरितां प्रसिद्ध केलें आहे.*

### बिलाचा थोडासा पूर्वेतिहास

पाश्चिमात्य पद्धतीवर बँकिंगचे व्यवहार इकडे सुरू झाल्यावर हळूहळू बऱ्याच बँका या देशांत स्थापन झाल्या. १९१३ सालीं जो कंपनीचा कायदा झाला त्यांतल्याच कलमानुसार, बँक ही कंपनीच असल्यामुळें बँकांचे व्यवहारावर निर्बंध असे. कंपनी कायदा, लॉ ऑफ कॉंट्रक्टस, मर्कन्टाईल लॉ वगैरे कायदे आस्तित्वांत असल्यामुळें काम निभावून जात असे. पण बँका व इतर कंपन्या यांच्यांतील फारच मोठा फरक त्यावेळीं कोणीं फारसा लक्षांत घेतलेला दिसत नाहीं. इतर कंपन्या या भागीदारांच्या असल्याकारणानें कंपनीच्या कायद्यांत त्यांच्याच हिताचें संरक्षण कसें होईल इकडे जास्त लक्ष दिलें गेलें; पण बँकांच्या बाबतींत ज्या विश्वासावर ठेवीदार आपली ठेव बँकेंत ठेवतात, तो विश्वास त्यांच्या हिताचें संरक्षण होऊन चांगला रक्षिला जाईल याकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. तें त्या वेळीं दिलें गेलेलें दिसत नाहीं.

### बँका कां बुडाल्या ?

याचा परिणाम सहाजिकच असा झाला कीं, पहिलें महायुद्ध संपल्यानंतर त्या काळांत आपला व्यापार जसा वाढला, तशा बँकाही खूप वाढल्या. त्यांत सहाजिकच गैरव्यवस्था निरनिराळ्या प्रकारें वाढली. अनुभव कमी, कुवतीपेक्षां जास्त धंदा करण्याची हांव, रोख शिल्लक कमी ठेवण्याकडे प्रवृत्ति, बँकिंगच्या प्रमेयांना धाब्यावर बसवून त्याव्यतिरिक्त इतर व्यवहारांमध्यें इन्व्हेस्टमेंटसची गुंतवणूक, कांहीं ठिकाणीं झटपट पैसे मिळूं शकतील अशा रोख्यामध्यें पैसे गुंतवलेले, तर कांहीं ठिकाणीं भरमसाट कर्जें दिलेलीं, अशा निरनिराळ्या कारणामुळें पुष्कळ बँका त्या काळांत बुडाल्या. कंपनी कायदा ठेविदारांचें फारसें संरक्षण करूं शकला नाहीं. १९३६ मध्यें मात्र कंपनीच्या कायद्यांत ज्यावेळीं दुरुस्ती झाली त्यावेळीं बँकांना विशेष संरक्षण मिळेल याकडे जास्त लक्ष दिलें गेलें.

### बिलाचा जन्म

दुसऱ्या जागतिक युद्धाचा परिणाम आपल्या सर्वांच्या मनांत अजून अगदीं ताजा आहे. व्यापार व उद्योग यांना भरमसाट तेजी आली तसा बँकांनाहीं जणूं कांहीं ऊत आला ! ज्यानें उठावें त्यानें बँक काढावी अशी परिस्थिति आली. ही इतकी गोष्ट डोळ्यांत आली कीं ठेवीदारांचें संरक्षण कोणत्या तरी कायद्यान्वयें करणें अत्यंत आवश्यक आहे, असें रिझर्व बँकेला व सरकारलाही वाटावयास लागलें व दुसऱ्या महायुद्धाच्या भाऊ गर्दींत जरी कायदा करण्याचें मागें पडलें तरी वेळोवेळीं उचल खात खात व मध्यंतरीच्या मिळालेल्या अनुभवाच्या जोरावर त्यामध्यें वेळोवेळीं सुधारणा होत होत या सध्यांच्या बिलाचा जन्म होत आहे. निरनिराळ्या वेळीं नेमलेल्या तज्ज्ञ कमिट्यांनीं केलेल्या शिफारशींचा, रिझर्व बँकेनें मिळवलेल्या अनुभवाचा व इतर बँका आणि लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील सभासद व सरकार यांच्या व्यावहारिक सूचनांचा, हा कायदा म्हणजे परिपाकच होय असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

### कांहीं प्रमुख सुधारणा

बँकांच्या पूर्वेतिहासावरून असें दिसतें कीं बऱ्याच बँका अपुऱ्या भांडवलामुळें डबघाईस आल्या. कारण जो उठला त्यानें शहरांत आपली बँक अगर शाखा उघडली ! खेड्यांतून किंवा दूरदूरच्या ठिकाणीं बँका अगर शाखा कुणीच उघडेना. याचा परिणाम असा झाला कीं होत्या तिथें अजीर्ण होईल इतक्या बँका. नाहीं तिथें मुळींच नाहीं. मग व्यवहार करण्याच्या दृष्टीनें एकमेकांमध्यें चुरस लागणें, कमी व्याजावर व असुरक्षित तारणावर भरमसाट कर्जें देणें सुरू झालें. फायदा कमी, धोका जास्ती, त्यामुळें परिणाम जो व्हायचा तोच झाला. हें सर्व टाळण्यासाठी या कायद्यानुसार बँकेला कमींत कमी भांडवल किती पाहिजे, शाखा उघडावयाच्या असल्यास प्रत्येक शाखेनुसार त्यामध्यें किती वाढ करायला हवी यासंबंधीं नियम करण्यांत आले आहेत. मॅनेजिंग एजंट्सचें, नफ्यामध्यें भागी ठेवून, अगर साधारणपणें त्या व्यवहारांत मिळणाऱ्या नफ्याशी ज्याचा मुळींच मेळ बसणार नाहीं असा भरमसाट पगार घेणारांचें, एकाच वेळीं एकापेक्षां अधिक बँकेंत डायरेक्टर म्हणून काम करणारांचें व कंपनीची व्यवस्था पहाण्याचें ५ वर्षांपेक्षां जास्त मुदतीचे करार असणारांचें उच्चाटन पूर्वींच झालेलें आहे. पण या बिलानुसार आणखी एक पुस्ती जोडलेली आहे. ती अशी कीं डायरेक्टरांच्या इच्छेनुसार व्यवस्थेचा करार ५ वर्षें अगर पुढेंही पुन्हा पुन्हा वाढवावयाचा असेल तर त्यास साधारण सभेची आगाऊ संमति पाहिजे. यामुळें निदान कामासंबंधीं काय व्यवस्था केली जात असते हें भागीदारांच्या नजरेस आणलें जाऊन वाटलें तर त्यांस त्यावर आक्षेप घेण्याची संधि मिळूं शकेल.

भांडवल उभारतांना त्यावर जें कमिशन, ब्रोकरेज किंवा डिस्काउंट दिलें जातें तें कंपनी कायद्यानें जास्तींत जास्त ५ टॅ. देतां येत असे. त्याची जास्तींत जास्त मर्यादा कायद्यांत २½ टॅ. ठेवण्यांत आली आहे. डिव्हिडंड देतांना व नफा वाटतांना ह्यावर निर्बंध घालण्यांत आले आहेत. बँक सुरू करतांना प्राथमिक खर्च, शेअर विक्रीबाबत दिलेलें कमिशन वगैरेचा खर्च, तसाच ऑर्गनाइझेशन एक्सपेन्सेस म्हणून जो खर्च केलेला असतो तो एका वर्षांच्याच नफ्यामधून वजा न करतां कांहीं विशिष्ट वर्षांमध्यें वजा करण्याची परवानगी असते. असें चालूं असतांना शक्य तर एकीकडे भागीदारांस थोड्या प्रमाणांत डिव्हिडंडही वाटतां येत असे. या नवीन कायद्याप्रमाणें हे सर्व खर्च, तसेंच जिंदगींत न दिसणाऱ्या अशा तोटयाच्या रकमा, नफ्यामधून काढून टाकल्याशिवाय डिव्हिडंडच वाटतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें १ जानेवारी १९४८ च्या पुढें ज्या बँका स्थापन झाल्या त्यांस त्यांच्या वसूल झालेल्या भांडवलावर शेंकडा ९ टक्क्यांपेक्षां जास्त डिव्हिडंड देतां येणार नाहीं. यामुळें एक फायदा असा होऊं शकेल कीं यापेक्षां जास्त राहिलेली नफ्याची रकम रिझर्व किंवा इतर तऱ्हेनें शिल्लक राहिल्यामुळें तितक्या प्रमाणांत बँकेची स्थिति सुधारण्यास मदतच होईल.

("व्यापार–उद्योग" मधील लेखांतील उतारा)

* पहा "अर्थ" ता. २१ एप्रिल, १९४८, पृ. १२२

## दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.
(वार्षिक सभा: ४-८-४८)

वरील कंपनीस १९४७ हें साल १९४६ पेक्षाहि वाईट गेलें. जातीय दंग्यांचा बहुतेक रेशीम केंद्रांस त्रास झाला. आयातीस परवाने दिले जाणार नाहींत असें मध्यवर्ती सरकारनें वारंवार आश्वासन दिलें, तरी सुद्धां इटालियन रेशमानें हिंदी उत्पादनाच्या पेक्षा ८ ते १० रु. कमी इतक्या दरानें बाजार पेठ व्यापून टाकली. ह्याहिपेक्षा कमी दरानें रेशीम येण्याची भीति होती. त्यामुळें, रेशमाची बाजारपेठ कोसळली. योजना आखणें अशक्य झालें आणि चतुरपणें नुकसानी कमी करणें एवढेंच शक्य झालें. प्रतिकूल हवामान आणि पाऊसपाणी ह्यांमुळें अडचणींत आणखी भरच पडली. कोशिटयांचें पीक चांगलें आलें नाहीं आणि कंपनीचे कारखाने अर्धी मजुरी देत राहून दीर्घ काळ बंद ठेवावे लागले. कंपनीच्या व्यवहारांत तिला २,३४,९७४ रु. तोटा आहे. त्यांत व्यवस्था खर्चाची भर पडून एकूण तोटा २,९६,५९९ रु. झाला आहे. कराच्या तरतुदीसाठी राखून ठेवलेल्या जादा रकमेंतून ७३,००० रु. जमेकडे घेतले नसते, तर हा तोटा त्या रकमेनें आणखी वाढला असता. कंपनीचा रिझर्व्ह फंड व शेअर्सवरील प्रीमियम ह्या खातीं ४,१८,७४० रु. आहेत. त्यांतून हें नुकसान वजा टाकून तें खातें नुकसानीच्या रकमेनें कमी करण्यांत येणार आहे. आतां राजकीय परिस्थिति सुधारत आहे. आयात रेशमाचा ओघ नियंत्रित करण्यांत आला आहे. टारिफ बोर्डाची चौकशी चालू आहे, तिचेंतून हिंदी धंद्यास पुरेसें संरक्षण मिळण्याची अपेक्षा आहे. परिस्थिति निवळताच, कंपनी पूर्ववत किफायतशीर ताळेबंद दाखवूं शकेल.

---

## ठेवीदारांनाच नफा देणाऱ्या म्युच्युअल सेव्हिंग्ज बँका

विमेदारांच्या मालकीच्या म्युच्युअल विमा कंपन्या आपल्या परिचयाच्या आहेत; अशा कंपन्यांना होणाऱ्या नफ्यांत वाटा मागणारे भागीदार कोणीहि नसतात. विमेदारांतच सर्व नफा वाटला जातो. ह्याच म्युच्युअल तत्त्वावर चालणाऱ्या बँका मात्र आपल्या इकडे नाहींत. म्युच्युअल बँकांच्या कल्पनेनें अमेरिकेंत चांगलें मूळ धरलेलें आहे, असें त्यांच्या प्रगतीवरून दिसून येतें. अमेरिकेंतील बहुतेक सेव्हिंग्ज बँका म्युच्युअल आहेत; म्हणजे त्यांच्या व्यवहारांतील नफा ठेवीदारांनाच जादा व्याजाच्या रूपानें मिळतो. सरकारी देखरेखीखालीं त्या चालतात व त्यांची व्यवस्था पगारी अधिकारी पहातात. न्यूयॉर्क, न्यूजर्सी, इत्यादि ठिकाणच्या कायद्याप्रमाणें तर सर्व सेव्हिंग्ज बँका म्युच्युअल स्वरूपाच्या असाव्या लागतात. पहिली म्युच्युअल सेव्हिंग्ज बँक १८१६ सालीं स्थापन झाली; आतां त्यांची संख्या ५०० वर गेली आहे. सुमारें १ कोटी, ८० लक्ष ठेवीदारांच्या २,००० कोटी डॉलर्सच्या ठेवी त्या बँकांकडे आज आहेत. अमेरिकेंतील म्युच्युअल सेव्हिंग्ज बँकांचें इकडे अनुकरण करतां येण्याजोगें आहे.

---

**तीस लाख टन धान्याची नासाडी**—हिंदी सरकारचे शेतकी व अन्नमंत्रि श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं दिल्लीला पहिल्या 'रेफ्रिजरेशन डेव्हलपमेंट' परिषदेचें उद्घाटन नुकतेंच केलें. सदर प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले, "हिंदुस्थानांत उंदीर व कृमि-कीटक ह्यांनीं जवळजवळ ३० लाख टन धान्याची गेल्या वर्षी नासाडी केली. ही नासाडी आपण थांबवूं शकलों असतों, तर अलीकडे भासणारी धान्याची तूट सहज भरून काढतां आली असती आणि परदेशाहून धान्य आयात करण्याचा प्रसंग आला नसता. लहान गावांतून व मोठ्या शहरांतून प्रशीतन (रेफ्रिजरेशन) पद्धतीचा अवलंब केल्यास अन्नधान्यांच्या शत्रूंचा नायनाट करून तीं पुष्कळ दिवस टिकवितां येतील."

**हिंदुस्थानांतील चलनवृद्धि**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक आणि आर्थिक समितीच्या अधिवेशनाला हजर रहाण्यासाठी समितीवरील हिंदचे प्रतिनिधी डॉ. लोकनाथन् नुकतेच युरोपला गेले. हिंदुस्थानांतील आर्थिक परिस्थितीसंबंधी मुलाखत देतांना ते म्हणाले, "हिंदुस्थान आणि आशिया ह्यांच्यापुढें आज सर्वांत तांतडीचा प्रश्न म्हणजे चलनवृद्धीवर हरतऱ्हेचे उपाय करून ती आटोक्यांत ठेवणें, हा आहे. हे उपाय पुरे पडले नाहींत तर हिंदुस्थानांत वस्तूंच्या पुरवठ्यावर व त्यांच्या किंमतीवरही नियंत्रणें ठेवणें भाग पडेल. हिंदुस्थानची पत चांगली आहे; परंतु ती टिकविण्याचें काम सरकारचें आहे. पैसे गुंतविण्यासाठी औद्योगिक धोरणाबद्दल विश्वासाचें वातावरण उत्पन्न करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. देशांतील चलनवृद्धीवर उपाय म्हणून पैशाच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवून कांहीं कार्य होण्यासारखें असलें, तरी वस्तूंचा अपुरा पुरवठा आणि उत्पादनाविषयीं निरुत्साह ह्यांमुळेंच चलनवृद्धी अधिक भासत आहे. हिंदुस्थानांत, नियंत्रणें रद्द करतांना जो परिणाम होईल अशी आशा वाटत होती तो झाला आहे कीं नाहीं ह्याविषयीं शंका वाटते."

**ट्रेडर्स बँक लिमिटेड**—ह्या बँकेच्या धनकोंना उद्देशून, दिल्लीच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें मंजूर केलेल्या योजनेनुसार पुढीलप्रमाणें नोटीस देण्यांत आली आहे. (१) ज्या धनिकांचे हक्कसंबंध १०० रु. पर्यंत होते, त्यांना ता. १२-७-४८ पासून पैसे देण्यास प्रारंभ झाला आहे. (२) १०० रु. पासून १,००० रु. पर्यंत ज्यांचे हक्कसंबंध असतील, आणि जे आपल्या हक्काच्या ६० टक्के रकम घेऊन संपूर्ण हक्कपूर्ततेची पावती देण्यास तयार असतील त्यांना ता. २-८-४८ पासून पैसे देण्यांत येतील. (३) इतर हक्कदारांनीं आपल्या पैशाचा रुजू झालेला पहिला हप्ता ता. १-९-४८ पासून घेऊन जावा. पाकिस्तानांतील बँकेच्या शाखांवर हक्कसंबंध असणाऱ्यांनीं नवी दिल्ली येथील बँकेच्या कचेरींत जाऊन चौकशी करावी व पैसे घ्यावे. वरील योजनेप्रमाणें धनकोंचे हक्क भागविण्याची सुरवात बँकेनें केली असल्यामुळें ज्या हक्कदारांनीं आपले क्लेम-फॉर्म्स अद्याप पाठविले नसतील त्यांनीं ते बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेंतून घेऊन भरून पाठवावे. कारण, हक्कसंबंधांची तपासणी करण्यास वेळ लागतो.

---

**पाकिस्तानी नोटा वटविण्याची सोय**—हिंदी नोटांवर 'गव्हर्नमेंट ऑफ पाकिस्तान' असे शब्द इंग्रजींत व उर्दूत असलेल्या पाकिस्तानी नोटा वटविण्याची व्यवस्था मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व कानपूर येथील रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यांतून करण्यांत आली आहे. नोटा वटवितांना शेकडा चार आणे कमिशन घेण्यांत येईल, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**बसमध्यें संगीत ऐकण्याची सोय**—अमेरिकेंतील सेंट लुइ ह्या शहरांतील बस व ट्रॅम्बे कंपनीनें एक नवा प्रयोग करून पहाण्याचें ठरविलें आहे. शहरांतील २० बसेसमध्यें दोन महिनेपर्यंत रेडिओ सेटस् लावण्याची व्यवस्था कंपनी करणार आहे. ही कल्पना यशस्वी झाली तर १ हजार बसेसमध्यें व ३०० ट्रॅम्समध्यें रेडिओ सेट्स बसवून उतारूंना संगीत ऐकवण्याची सोय करण्यांत येणार आहे. रेडिओवर फक्त संगीताचाच कार्यक्रम ऐकविण्यांत येईल; बाकीचे कार्यक्रम लावण्यांत येणार नाहींत.

**युगोस्लाव्हिआ-हिंद करार**—युगोस्लाव्हिआ व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान व्यापारी कराराविषयीं बोलणीं चालू असून ह्या करारावर लवकरच लंडन येथें उभय पक्षांतर्फे सह्या करण्यांत येतील अशी वार्ता आहे. हिंदुस्थान व स्वित्झरलंड ह्यांच्यांतही एक व्यापारी करार लवकरच पुरा होणार आहे.

## पाकिस्तान-ग्रेट ब्रिटन करार

### पौंडी शिलकेचा प्रश्न

३१ जून, १९४९ अखेर संपणाऱ्या वर्षासाठी पाकिस्तानला ग्रेट ब्रिटनकडून १ कोटी पौंड उपलब्ध करून दिले जातील. ह्यापैकी ५० लक्ष पौंड तात्काळ मिळूं शकतील आणि उरलेले ५० लक्ष पौंड विशिष्ट कामासाठी राखून ठेवले आहेत. पाकिस्तानची उत्पादनशक्ति वाढविण्याचें महत्त्व लक्षांत घेऊन, ५० लक्ष पौंडापर्यंत रकम डॉलर्सच्या स्वरूपांत देण्याचें ग्रेट ब्रिटननें मान्य केलें आहे.

### दि बँक ऑफ कोल्हापूर, लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर १९४७ अखेर संपलेल्या वर्षी १,८३, ४८१ रु. निवळ नफा झाला. त्यांत मागील सालचा शिलकी नफा मिळविला म्हणजे नफ्याची रकम १,९५,८९६ रु. होते. पहिल्या सहामाहीसाठी डिफर्ड शेअरवर प्रत्येकीं १५ रु. व ऑर्डिनरी शेअरवर ३ रु. २ आ. डिव्हिडंड आणि प्रत्येक शेअरला १ रु. बोनस ह्यांस २१,६६५ रु. लागले. म्हणजे, आतां नफावाटणीसाठी १,७४, २३१ रु. उरतात. त्यांतून १ लक्ष रुपयांची करासाठी तरतूद करून; १५,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून; ५ हजार रु. बॅड डेट फंडांत टाकून व ५ हजार रु. डि. ई. फंडाकडे वर्ग करून ९,३४५ रुपयांचा विनियोग डिफर्ड शेअर्सवर प्रत्येकीं १५८ रु. १२ आ. ६ पै ( त्यांतून आधी दिलेले १५ रु. वजा करावयाचे ) डिव्हिडंड देण्याकडे करण्यांत आला. १-७-४७ ते ३१-१२-४७ चें ऑर्डिनरी भागांवरील १२½% डिव्हिडंड देण्यास २८,४३८ रु. लागले आणि ११,४४८ रु. पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत आले. तीन महिन्यांच्या पगाराइतका बोनस ( २७,४०९ रु. ) नोकरवर्गाला देण्याची नफा-तोटा पत्रकांत तरतूद करण्यांत आली आहे. बँकेनें मांडवी ( मुंबई ) शाखा डिसेंबर, १९४७ मध्यें सुरू केली. म्हणजे, बँकेच्या आतां एकूण १० शाखा झाल्या आहेत. बँकेचें खपलेलें भांडवल २०,२६,००० रु. असून वसूल भांडवल १०,१३,००० रु. आहे. तिचा रिझर्व्ह फंड ७ लक्ष, ८६ हजार रु. आहे. कोल्हापूर स्टेटचे मुख्य प्रधान रा. ब. दादासाहेब सुर्वे हे बँकेचे चेअरमन असून ॲडमिनिस्ट्रेटर कॅ. नंजप्पा, चीफ सेक्रेटरी राव. मेजर देशमुख व ऑडिटर जनरल-फिनॅनशिअल अडव्हाइसर श्री. सुब्रम्हण्यम हे तिचे दरबारतर्फे बोर्डावर डायरेक्टर आहेत. श्री. व्ही. ए. सावंत हे जनरल मॅनेजर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. १८ जुलै रोजीं झाली.

### अमेरिकन प्रवाशांचा युरोपांत संचार

चालू वर्षी ३,००,००० अमेरिकन लोक युरोपचा प्रवास करून त्यांवर ३५ कोटी डॉलर्स खर्च करतील, असा ताजा अंदाज आहे. आतांपर्यंत युरोपकडे गेलेल्या सर्वांत ज्यास्त प्रवाशांची संख्या १९३० सालीं भरली होती; त्यावर्षी २,७९,००० प्रवासी तिकडे गेले. प्रवाशांच्या खर्चाच्या मानानें १९२९ सालानें उच्चांक गाठला होता; त्या वर्षी प्रवाशांनीं ३५ कोटी डॉलर खर्च केले होते. येत्या चार वर्षांत अमेरिकन प्रवाशांच्यामुळें युरोपांत २½ अब्ज डॉलर जातील अशी अपेक्षा आहे. १९४८ मध्यें प्रत्येक अमेरिकन प्रवासी युरोपांत ४५ ते ६० दिवस राहील आणि प्रवास, हॉटेल, अन्न, इत्यादींवर दररोज २० ते २५ डॉलर खर्च करील. नोव्हेंबर अखेरच्या विमानांतील आणि आगबोटींतील जागा आतांच राखून ठेवल्या गेल्या आहेत. वहातुकीची अडचण नसती, तर आणखी कितीतरी प्रवासी युरोपकडे गेले असते. ग्रेट ब्रिटन व फ्रान्स ह्या देशांत प्रत्येकीं १,००,००० अमेरिकन प्रवासी जातील, असा अंदाज आहे.





# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

— शेड्यूल्ड बँक —

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

**संचालक मंडळ**

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन )
श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन )

| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पद्मजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. मो. रा. ढमढेरे |

ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर.






## "बिर्ला" योजनेचें एक वैशिष्ट्य

श्री. बिर्ला ह्यांनीं हिंदच्या पुनर्घटनेसाठीं १२२० कोटी रु. चा एक पंचवार्षिक कार्यक्रम सुचविला आहे. ह्या योजनेची एक विशेष गोष्ट ही कीं शेतीच्या पुनर्घटनेसाठीं ३४६ कोटी रु. म्हणजे एकंदर योजनेच्या ३० टक्के खर्च सुचविण्यांत आला आहे व शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठीं विस्तृत शेती, विहिरी, कालवे इ. पाणीपुरवठ्याच्या योजना, टी. व्ही. ए. योजनेप्रमाणें अनेक बाजू असलेल्या पाटबंधाऱ्यांच्या योजना, खत, चांगलें बीं-बियाणें, ऊंस व कापूस यांच्या लागवडींत सुधारणा इ. सुधारणेच्या बाजू सुचविण्यांत आल्या आहेत. "मुंबई" योजनेमध्यें औद्योगिक विकासावर विशेष भर देण्यांत आला होता व शेतीच्या वाढीकडे दुर्लक्ष झालें होतें. ही उणीव श्री. बिर्ला ह्यांच्या नवीन योजनेनें दूर केली आहे.

विशेषतः १९४३ पासून आपली अन्नविषयक परिस्थिति फार बिकट होत गेली व परदेशांतून धान्याच्या आयातीसाठीं कोट्यावधी रुपये खर्चावे लागले. आपल्या स्वातंत्र्यानंतर अन्नपुरवठ्याच्या दृष्टीनें परिस्थिति जास्तच कमकुवत झाली. हिंदचें आर्थिक जीवन सुधारतांना उद्योगधंद्यांबरोबरच शेतीच्या उत्पन्नाच्या वाढीकडे लक्ष पुरविलें पाहिजे. जमीनदारी पद्धति नष्ट करणें व शेत कसणाऱ्या शेतकऱ्यालाच जमिनीचा मालक बनविणें ही दृष्टि प्रांतिक सरकारच्या शेती-सुधारणेच्या कार्यक्रमांत प्रामुख्यानें आढळून येते. त्याबरोबरच निरनिराळ्या सुधारलेल्या उपायांनीं शेतीचें प्रत्यक्ष उत्पादन वाढविणें फार आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें श्री. बिर्ला यांच्या नवीन योजनेनें योग्य दिशेनें पाऊल पुढें टाकलें आहे, व शेतीच्या निरनिराळ्या योजनांवर ३४६कोटी रु. खर्च केले असतां, राष्ट्रीय उत्पन्नांत वार्षिक ४०१ कोटी रु. ची वाढ होईल असा अंदाज आहे. पूर्वी सरकारनें युद्धकाळांत 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेवर चार वर्षांत १२ कोटी रु. खर्च केले, परंतु एवढा खर्च करून शेतीच्या उत्पन्नांत किती किंमतीची वाढ झाली याचे आंकडे कोठेंहि उपलब्ध नाहींत. उ. ऊंस व कापूस ह्यांच्या लागवडीवरच अनुक्रमें २२ कोटी रु. व ७५ कोटी रु. खर्चिले जावे असें त्यांच्या योजनेंत आहे. हिंदला कच्च्या कापसाच्या बाबतींत शक्य तितकें स्वयंपूर्ण बनविण्याच्या दृष्टीनें कापसाच्या लागवडीवरील ज्यास्त खर्च योग्यच आहे.

सध्या प्रांतिक सरकारांपुढें जमिनदारी नष्ट करून व कायदे पास करून शेतीची व शेतकऱ्याची परिस्थिति सुधारणें हा कार्यक्रम आहेच. अशा वेळींच श्री. बिर्ला यांच्या योजनेनें शेतीचें उत्पन्न वाढविण्याचे कांहीं व्यावहारिक मार्ग दाखविले आहेत हें योग्य व अभिनंदनीय आहे. शेती सुधारणेच्या बाबतींत केवळ कायदे पास करून फारच थोडी प्रगति होऊं शकते. प्रत्येक खेडेगांवांतून शेतीचें उत्पन्न वाढविण्याचे विधायक मार्ग हातीं घेतले गेले पाहिजेत. ह्या बाबतींत शेती खातें, सहकारी खातें, ग्रामोद्योग खातें व ठिकठिकाणच्या ग्रामसंस्था त्यांनीं एकमतानें प्रयत्न करून एका वर्षांत उत्पन्न कांहीं प्रमाणांत वाढलें असें निश्चित दाखविलें पाहिजे. तरच अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न सुटूं शकेल.

**रिझर्व्ह बँकेची वार्षिक सभा**—रिझर्व्ह बँकेची १४ वी वार्षिक सभा ता. ९ ऑगस्ट रोजीं मुंबई येथें भरणार आहे. त्यावेळीं ३० जून असेरच्या ताळेबंदाचा विचार केला जाईल व हिशेब तपासनीस निवडले जातील.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा-कित्तूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठीं ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठीं लिहा.

पोस्ट:-कृष्णा-कित्तूर
जिल्हा:-बेळगांव.

विंचूरकर अँण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

विजय टेक्स्टाइल्स लि.

-येरंडवणा, पुणें ४-

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व प्रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.